महाराष्ट्र शासन
# कला संचालनालय
सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई -1
controllerofexamination.doa@gmail.com दुरध्वनी क्र.(022)22620231/32 directorateofart@gmail.com

क्रमांक: परीक्षा/शारेप-2019/IV/ 1203 दिनांक :- 13/09/2019

**कालमर्यादित**

प्रति,
सर्व केंद्रप्रमुख तथा प्राचार्य / मुख्याध्यापक
शासकीय रेखाकला परीक्षा २०१९ .

**विषय :- प्रश्नपत्रिकांची मोहोरबंद पाकीटे घेऊन जाण्याबाबत.**
**शासकीय रेखाकला परीक्षा- २०१९.**

शासकीय रेखाकला परीक्षा केंद्रांचे सर्व केंद्रप्रमुख तथा प्राचार्य / मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, शासकीय रेखाकला परीक्षा- २०१९ प्रश्नपत्रिकांची मोहोरबंद पाकीटे खाली नमुद केलेल्या प्रश्नसंच वितरण केंद्रावरुन वितरीत करण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | परीक्षा केंद्राचा जिल्हा | प्रश्नसंच वितरण केंद्र | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर,मुंबई उपनगर, ठाणे, पालघर व रायगड. | **मुंबई** | कला संचालनालय,सर ज.जी कला शाळा आवार, मुंबई. |
| २ | नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा. | **नागपूर** | अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर, नागपूर. |
| ३ | औरंगाबाद,अहमदनगर,जालना,परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद व लातूर. | **औरंगाबाद** | अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद. |
| ४ | नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव | **नाशिक** | प्राचार्य, श्री रचना चित्रकला महाविद्यालय, पाटील नगरच्या बाजुला, कोठावळे मळा, सिडको, नाशिक. |
| ५ | पुणे व सोलापूर | **पुणे** | प्राचार्य, एम.सी.ई.एज्यूकेशन सोसा. संचलित कला महाविद्यालय, आझम कॅम्पस, न्यू मोदीखाना, पुणे कॅम्प, पुणे. |
| ६ | सातारा, सांगली व कोल्हापूर, | **सांगली** | प्राचार्य, कला विश्व महाविदयालय, शांतीनिकेतन आवार, सांगली. |
| ७ | अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम व बुलढाणा. | **अमरावती** | प्राचार्य, चित्रकला महाविद्यालय, जनता कृषी विद्यालयाचे आवार, मोर्शी रोड, अमरावती . |
| ८ | रत्नागिरी व सिंधूदुर्ग | **सावर्डे** | प्राचार्य, सह्याद्री स्कुल ऑफ आर्ट, मु. पो. सावर्डे, ता. चिपळूण, जिल्हा- रत्नागिरी. |

२. परीक्षा केंद्राचे केंद्र प्रमुख तथा प्राचार्य / मुख्याध्यापक यांनी व्यक्तीश: अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या जबाबदार व्यक्तीमार्फत (कला शिक्षक / परीक्षेचे गांभीर्य विचारात घेऊन काम करणारे लिपिक संवर्गातील कर्मचारी ) प्रश्नपत्रिकांची मोहोरबंद पाकीटे प्रश्नसंच वितरण केंद्रावरुन दिनांक २३ व २४ सप्टेंबर, २०१९ या कालावधीत ताब्यात घेऊन आपल्या अभिरक्षेत ठेवावी व परीक्षेच्या वेळापत्रकानुसार दोन्ही परीक्षांचे आयोजन करावे.

३. प्राधिकार पत्राशिवाय प्रश्नसंच वितरण केंद्रावरुन प्रश्नपत्रिकांची मोहोरबंद पाकीटे दिली जाणार नाहीत, याची नोंद घेऊन शाळेच्या नाममुद्रीत पत्रावर (लेटरहेड) परीक्षा केंद्र क्रमांक, प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे संपूर्ण नाव, पदनाम, संपर्कासाठी संबधीताचा मोबाईल क्रमांक टंकलिखित करुन संबंधीताची नमुना स्वाक्षरी केंद्रप्रमुख तथा प्राचार्य/ मुख्याध्यापक यांनी साक्षांकीत करुन प्राधिकार पत्र निर्गमित करावे व प्राधिकार पत्रासोबत संबधीताचे नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेले ओळखपत्र / आधारकार्डची साक्षांकीत प्रत सोबत सादर करावी. प्राधिकार पत्रावर प्राचार्यांनी स्वाक्षरीखाली संपूर्ण नाव व पदनामाच्या शिक्क्याखाली स्वत: चा मोबाईल क्रमांक नमुद करावा.

(नागेश वाघमोडे)
परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपुर.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
३) प्राचार्य, श्री रचना चित्रकला महाविद्यालय, पाटील नगरच्या बाजुला, कोठावळे मळा, सिडको, नाशिक.
४) प्राचार्य, एम.सी.ई.एज्यूकेशन सोसा. संचलित कला महाविद्यालय, आझम कॅम्पस, न्यू मोदीखाना, पुणे कॅम्प, पुणे.
५) प्राचार्य, कला विश्व महाविदयालय, शांतीनिकेतन आवार, सांगली.
६) प्राचार्य, चित्रकला महाविद्यालय, जनता कृषी विद्यालयाचे आवार, मोर्शी रोड, अमरावती.
७) प्राचार्य, सह्याद्री स्कुल ऑफ आर्ट, मु. पो. सावर्डे, ता. चिपळूण, जिल्हा- रत्नागिरी.
८) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१०) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
११) सर्व शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई (पूर्व,पश्चिम व उत्तर)
१२) निरिक्षक चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३) निवड नस्ती.